डॉ. बद्रीनारायण बारवाले कृषि महाविद्यालय, खरपूडी (जि. जालना) च्या विद्यार्थ्याचे राज्यस्तरीय यश

खरपूडी (जि. जालना): डॉ. बद्रीनारायण बारवाले कृषि महाविद्यालय, खरपूडी येथील विद्यार्थी श्री. सुभाष बाळू सरडे याने महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे. यांनी घेतलेल्या पी. जी. सी. ई. टी. २०२६ या परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

या परीक्षेत त्यानी उद्यानविद्या (Horticulture)शाखेत महाराष्ट्र राज्यात प्रथम क्रमांक तर कृषी (Agriculture) शाखेत महाराष्ट्र राज्यात द्वितीय क्रमांक मिळवून महाविद्यालयासह जालना जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे.

श्री. सुभाष सरडे याच्या या अभूतपूर्व यशाबद्दल मराठवाडा शेती सहाय्य मंडळाचे अध्यक्ष कृषीरत्न माननीय श्री.  विजय अण्णा बोराडे व संस्थेचे विश्वस्त कृषीभूषण आदरणीय भगवान दादा काळे तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य  श्री. डॉ. व्हि. एल. देशमुख सर, दीपस्तंभ स्पर्धा परीक्षा मंच प्रमुख प्रा. साळुंखे मॅडम, सह प्रमुख  बोबडे सर, सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी तसेच पालकांनी त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या आहेत.

त्याच्या अथक परिश्रम, सातत्यपूर्ण अभ्यास आणि महाविद्यालयातील प्राध्यापकांचे योग्य मार्गदर्शन यावर मिळविलेले हे यश इतर विद्यार्थ्यांसाठी निश्चितच प्रेरणादायी ठरणार आहे. त्याच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल सर्व स्तरांतून कौतुकाचा वर्षाव होत असून, भविष्यातही ते अशीच उज्ज्वल कामगिरी करतील, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

डॉ. बद्रीनारायण बारवाले कृषि महाविद्यालय, खरपूडी परिवारातर्फे श्री. सुभाष बाळू सरडे याचे मनःपूर्वक अभिनंदन व भावी वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा!